# 'दादा'च्या भूमिकेत राजकुमार राव

## सौरव गांगुली यांच्या जीवनावर आधारित 'दादा: द सौरव गांगुली स्टोरी' या चित्रपटाचा फर्स्ट लुक प्रदर्शित

**महाईन्यूज । पोर्तुगल**

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली यांच्या आयुष्यावर आधारित 'दादा: द सौरव गांगुली स्टोरी' या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा पहिला लुक अखेर समोर आला आहे. विशेष म्हणजे, गांगुली यांच्या वाढदिवसानिमित्त हा फर्स्ट लुक प्रदर्शित करण्यात आला असून चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीखही जाहीर करण्यात आली आहे. या चित्रपटात राजकुमार राव सौरव गांगुली यांच्या भूमिकेत झळकणार असून त्याचा लुक चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे.**



पोस्टरमध्ये राजकुमार राव यांनी साकारलेला गांगुलींचा ऐतिहासिक अंदाज पाहायला मिळतो. 2002 मध्ये लॉर्ड्स मैदानावर नेटवेस्ट ट्रॉफी जिंकल्यानंतर गांगुलींनी बाल्कनीत टी-शर्ट हवेत फिरवत केलेला जल्लोष भारतीय क्रिकेटमधील सर्वात संस्मरणीय क्षणांपैकी एक मानला जातो. हाच क्षण चित्रपटाच्या फर्स्ट लुकमध्ये पुन्हा जिवंत करण्यात आला आहे.

राजकुमार राव यांनी हा फर्स्ट लुक त्यांच्या सोशल मीडियावर शेअर करत सौरव गांगुलींना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. पोस्टर समोर येताच सोशल मीडियावर चाहत्यांकडून त्याचे जोरदार स्वागत होत आहे.

एका मुलाखतीत राजकुमार राव यांनी सांगितले की, सौरव गांगुली यांची भूमिका साकारणे ही केवळ अभिनयाची संधी नसून त्यांच्या आयुष्यातील एक मोठा सन्मान आहे. गांगुली हे फक्त यशस्वी कर्णधार नाहीत, तर लाखो भारतीयांसाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या संघर्षाची आणि यशाची कहाणी मोठ्या पडद्यावर साकारताना मोठी जबाबदारी असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

'दादा: द सौरव गांगुली स्टोरी' हा चित्रपट 14 मे रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या घोषणेनंतर आता प्रेक्षकांना त्याच्या टीझर आणि ट्रेलरची उत्सुकता लागली आहे.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक असलेल्या सौरव गांगुली यांच्या जीवनावर आधारित हा चित्रपट चाहत्यांसाठी खास आकर्षण ठरणार आहे. त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीतील संघर्ष, नेतृत्व, आक्रमक वृत्ती आणि भारतीय संघाला नव्या उंचीवर नेण्याचा प्रवास या चित्रपटातून उलगडला जाणार आहे. फर्स्ट लुकमधूनच चित्रपटाचा भव्यपणा आणि वास्तवदर्शी मांडणीची झलक पाहायला मिळत आहे. राजकुमार राव यांचा लूक आणि देहबोली गांगुली यांच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळतीजुळती असल्याने चाहत्यांकडून त्यांचे विशेष कौतुक होत आहे. त्यामुळे चित्रपटाबाबतची उत्सुकता आणखी वाढली आहे.

# क्रिडाविश्वात शोककळा! 'या' माजी क्रिकेटपटूचे निधन

**महाईन्यूज । अफगाणिस्तान**

**अफगाणिस्तान क्रिकेट जगतातून (Cricketer Pass Away) अत्यंत धक्कादायक आणि दुःखद बातमी समोर आली आहे. संघाचे माजी धडाकेबाज वेगवान गोलंदाज शापूर जदरान यांचे सोमवारी (७ जुलै) वयाच्या अवघ्या ३८ व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही महिन्यांपासून ते एका अत्यंत दुर्मीळ आणि गंभीर आजाराशी झुंज देत होते.**



### 'HLH' या दुर्मीळ आजाराशी झुंज अपयशी

मिळालेल्या माहितीनुसार, शापूर जदरान हे 'हेमोफॅगोसाइटिक लिम्फोहिस्टिओसायटोसिस' (HLH) या अत्यंत दुर्मीळ आणि जीवघेण्या आजाराने ग्रस्त होते. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात त्यांची प्रकृती अचानक खालावली होती. सुरुवातीला त्यांच्यावर अफगाणिस्तानमध्येच (CRICKETER PASS AWAY) उपचार करण्यात आले, परंतु प्रकृतीत सुधारणा न झाल्याने अधिक प्रगत वैद्यकीय उपचारांसाठी त्यांना भारतात आणण्यात आले होते.

त्यांच्यावर भारताची राजधानी दिल्ली येथील एका रुग्णालयात उपचार सुरू होते, मात्र डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतरही त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण क्रिकेटविश्वावर शोककळा पसरली आहे.

दिल्लीतील एका नामांकित रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात (ICU) त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या आजारपणाची माहिती मिळताच अफगाणिस्तानचे स्टार क्रिकेटपटू रशीद खान आणि मोहम्मद नबी यांनीही रुग्णालयात जाऊन त्यांची भेट घेतली होती आणि त्यांच्या तब्येतीची विचारपूस केली होती.

शापूर जदरान यांच्या निधनाची अधिकृत माहिती अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डने (ACB) सोशल मीडियाद्वारे दिली. बोर्डाने जारी केलेल्या शोकसंदेशात म्हटले आहे की, "शापूर जदरान यांचे अफगाणिस्तान क्रिकेटमधील योगदान कधीही विसरता येणार नाही. देशात क्रिकेटचा पाया मजबूत करण्यात आणि संघाला आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या जिद्दीने, अथक मेहनतीने आणि खेळावरील निष्ठेने देशातील अनेक युवा खेळाडूंना नेहमीच प्रेरित केले आहे." जदरान यांच्या कारकिर्दीत अनेक संस्मरणीय क्षण आले, पण २०१२ च्या टी-२० विश्वचषकातील भारताविरुद्धचा सामना त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरला. त्या सामन्यात जदरान यांनी आपल्या अचूक आणि आक्रमक गोलंदाजीने भारतीय फलंदाजांना चांगलाच त्रास दिला होता.